बीड । महाराष्ट्र
गुरूवार दि.१९/२/२०२६
वर्ष ५ वे । अंक ३१९
पान १ । पाने ४
किंमत ३ रुपये

महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 https://marathwadapatra.com https://epaper.marathwadapatra.com










## ३४ कर्मचाऱ्यांचे निलंबन,२७ जणांवर गुन्हे

# बोर्डाची मोठी कारवाई

**मुंबई । वृत्तसेवा**

राज्यात बारावी परीक्षा दरम्यान बोर्डाने मोठी कारवाई केली आहे. सामूहिक कॉपी प्रकरणी ३४ कर्मचारीवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. २७ कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करून निलंबन कारवाईसाठी प्रस्ताव देण्यात आला आहे, अशी माहिती बोर्डाचे अध्यक्ष नंदकुमार बेंडसे यांनी दिली आहे. बारावीच्या परीक्षेदरम्यान कालपर्यंत १०९ कॉपीची प्रकरणं राज्यभरात दाखल झाले आहेत. पुण्यात २७, नागपूरमध्ये ११, छत्रपती संभाजीनगरमध्ये ६, अमरावतीमध्ये ५०, नाशिकमध्ये ४ आणि लातूरमध्ये ११ ठिकाणी कॉपीची प्रकरण समोर आली आहेत.

- बीड आणि वाशीम जिल्ह्यात गंभीर प्रकार समोर आला
- राज्यभरात १०९ कॉपी प्रकरणे उघडकीस आली
- ३४ कर्मचारी निलंबित, २७ जणांवर गुन्हा दाखल
- कॉपीमुक्त अभियानासाठी सोशल मीडिया आणि सीसीटीव्हीचा वापर



### बीडमध्ये कॉपीचा प्रकार उघड

बीडच्या गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथे बारावीची परीक्षादरम्यान कॉपी करतानाचा व्हिडिओ समोर आला होता. दगडाला बांधून कॉफी वर्गामध्ये टाकतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. एकीकडे जिल्हाधिकारी यांनी कॉपी मुक्त अभियान राबवले आहे. प्रत्येक वर्गामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत, असं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं. मात्र याच ठिकाणी काही तरुण कॉफी देत असतानाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला त्यामुळे खळबळ उडाली.

### २६ जणांचे निलंबन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत वाशीम जिल्ह्यातील श्री मैनागिरी महाराज विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय टो–जुमडा येथे सामूहिक कॉपी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. राज्य मंडळाने आणि जिल्हा दक्षता समितीने या प्रकरणात कठोर कारवाई केली आहे. या प्रकरणी २६ जणांचे निलंबित करण्यात आले असून त्यांच्या विरोधात पोलिसात गुन्हा दाखल करण्याच्या सूचना दिल्या आहेत. बारावीच्या भौतिकशास्त्र विषयाच्या पेपरदरम्यान वाशीम जिल्ह्यातील श्री. मैनागिरी महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय टो–जुमडा या परीक्षा केंद्रावर भौतिकशास्त्र विषयाचा पेपर सुरू असतानाहा प्रकार घडला होता.

## थोडक्यात

### कष्टाचे ९ लाख अन् सोने लंपास

**पाटोदा । प्रतिनिधी**

बीडच्या पाटोदा तालुक्यातील जवळाला गावात सोमवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी हैदोस घालत दोन घरे फोडली. यामध्ये पोपट मच्छिंद्र कोठुळे यांच्या घरातील ९ लाख रुपयांची रोकड आणि अडीच तोळे सोन्याचे दागिने असा लाखो रुपयांचा ऐवज लंपास केला. मुलाने ऊस तोडणीच्या कष्टांतून जमा केलेली पुंजी चोरीला गेल्याने कोठुळे कुटुंबियांनी टाहो फोडला असून, या घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण आहे. चोरट्यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने ही चोरी केल्याचे समोर आले आहे. गावात प्रवेश करण्यापूर्वी चोरांनी सार्वजनिक डीपीमधील फ्युज काढून संपूर्ण गाव अंधारात लोटले. वीजपुरवठा खंडित झाल्याचा फायदा घेत चोरट्यांनी कोठुळे यांच्या घराचा कडीकोंडा आणि कुलूप तोडून आत प्रवेश केला. कपाटातील ▶▶ पान २ वर

### जयभिम महोत्सव

### कार्यक्रमांची ठरली रुपरेषा

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही जयभीम महोत्सव उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील तुलसी महाविद्यालय येथे बुधवार (ता. १८) रोजी महत्वपूर्ण नियोजन बैठक पार पडली. बैठकीत विविध उपक्रमांची सविस्तर चर्चा करून कार्यक्रमांची अंतिम रुपरेषा निश्चित करण्यात आली. बीडमध्ये यंदाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त महोत्सव अधिक व्यापक, प्रभावी आणि समाजप्रबोधनपर स्वरुपात आयोजित करण्याचा निर्णय समितीने घेतला आहे. महोत्सवाच्या माध्यमातून समता, ▶▶ पान २ वर

### छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त बीडमध्ये राष्ट्रपती महोदयांच्या उपस्थितीत

# राजधानी दिल्ली गाजवलेला मर्दानी खेळांचा जल्लोष..!



**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त बीड शहरात आज (दि. १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६:०० वाजता) छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर तत्कालीन महामहिम राष्ट्रपती रामनाथ कोविंद जी यांच्या उपस्थितीत दिल्ली येथील कार्यक्रम गाजवणारे, पारंपरिक मर्दानी खेळांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. शिवकालीन शौर्य, पराक्रम आणि परंपरेची आठवण करून देणारा हा दिमाखदार सोहळा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमात कोल्हापूर येथील नामांकित पथकाकडून पारंपरिक मर्दानी खेळांचे थरारक सादरीकरण करण्यात येणार असून तलवारबाजी, लाठी–काठी, दांडपट्टा आदी कौशल्यपूर्ण प्रकार प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहेत. शिवकालीन परंपरेची झलक आणि शौर्याची अनुभूती देणारे अनेक चित्त थरारक दृश्ये या कार्यक्रमात सादर केली जाणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित हा कार्यक्रम युवकांमध्ये पराक्रम, शिस्त आणि संस्कार ▶▶ पान २ वर

# एकाही बिअर बारला परवानगी दिली नाही




### ॲड.अजित देशमुख यांची माहिती

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात अधिकृत नोंदणी असलेली जवळपास साडेबाराशे बियर बार, बिअर शॉपी, देशी दारू आणि होलसेल दारू विक्रीची दुकाने आहेत. अशा परिस्थितीत सामाजिक स्वास्थ्य बिघडवायचे नसेल तर नवीन दारू दुकानांना परवानगी देऊ नका, अशी मागणी करण्यात आल्यानंतर आजच्या बैठकीमध्ये एकाही बिअर बार ला मंजुरी दिली नसल्याची माहिती ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी ▶▶ पान २ वर



## संपादकीय

# एआय सर्वांसाठी

सन २०२५-२६ पासून भारताने कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे एआय या क्षेत्रात आपले स्थान मजबूत केले. केंद्रीय चौकट जी २०२५ मध्येच निश्चित करण्यात आली होती. तिला आता व्यापक स्वरूप देण्यात आले. दिल्लीच्या भारत मंडपम येथे परिषद भरत आहे. एआय तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ तंत्रज्ञान म्हणून न करता तिचा उपयोग लोकांच्या कल्याणासाठी आणि विकास करण्याचा उद्देश आहे. सुरुवातीला या एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी १०,३७१.९२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. या द्वारे एआय संपूर्ण भारतासाठी कसे उपयुक्त ठरेल आणि मूलभूत मॉडेल्स आणि डेटा बेसेसाठी एआय तंत्रज्ञान कसे उपयुक्त ठरेल हे या परिषदेतून सांगितले जाईल. विषय सर्वसामान्यांना थोडा कळण्यास अवघड आहे. पण यासाठीच परिषद आहे. एआयचा उपयोग करून सामान्यांचे जीवन कसे सुसह्य करता येईल. लोकसमूह, ग्रह आणि प्रगती ही ती सूत्रे आहेत. ज्यांच्या भोवती परिषदेत काम केले जाईल आणि ही सूत्रे समावेशकता, शाश्वत आणि मानवी केंद्रीत एआय या भोवती रचना तयार करण्यात आली. लोकसमूह याचा अर्थ मानव केंद्रित एआय असून मानवतावादाची सेवा मानवांचे हक्क आणि सार्वजनिक सेवांप्रती सर्व लोकांना अधिकार तसेच विश्वासाची बांधणी करून देता येतो यावर हे सूत्र आधारलेले आहे. एआय समावेशक आणि मानवी प्रतिष्ठा यांना आणि भारतातील सांस्कृतिक वैविध्याचा आदर राखून जपवणूक करेल असे दुसरे सूत्र आहे. आपला ग्रह पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत एआय पद्धतींना अनूकूल राहील असाही उद्देश आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ऊर्जा सक्षम तंत्रज्ञान आणि जबाबदारीने वापर करून हवामान कृतींना पाठिंबा देईल अशी लवचिकता प्रदान करेल असे तंत्रज्ञान उभारणे असा आहे. भारतात भरणाऱ्या परिषदेची व्याप्ती इतकी मोठी आहे, की भारत मंडपम येथे भरणाऱ्या परिषदेत २.५ लाख प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे. यात परदेशातून फ्रान्सचे ईमॅन्युएल मॅक्रॉन, ब्राझिलचे लुला डासिल्व्हा, स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सँचेझ आदींसह उपस्थित रहाणार आहेत आणि परदेशातून तज्ज्ञ या परिषदेसाठी उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यात सुंदर पिचाई, सेमी कंडक्टर आणि फाईव्ह जी तंत्रज्ञान राबवण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेले क्रिस्तियानो एमोन आदींचा समावेश आहे. नवी दिल्लीत सुरू होणारी परिषद ही भारतासाठी अशा प्रकारची पहिलीच परिषद आहे आणि एआय धोक्यांचे कसे व्यवस्थापन करायचे हे शिकवणारी आहे. तसेच नावीन्यपूर्ण संशोधनाला रुळावर व्यवस्थित कसे ठेवायचे याचाही विचार केला जाणार आहे. याची जी चौकट आखली आहे ती एआयचा वापर करताना पक्षपात आणि गैरवापराला आळा घालणे आणि तसे करतानाही भारताचे हेतू जबाबदार एआय व्यवस्थापन करणे यापुरते मर्यादित आहे. या परिषदेतून भारताचा हेतू हा स्पष्ट होतो, की जबाबदार एआय गव्हर्नन्सला आकार देण्याचा आहे. पण यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा आहे, की एआयच्या मार्गदर्शक तत्त्वे जी आहेत ती आरोग्य, शिक्षण, कृषी आणि वित्त यात कशी उपयोगात आणली जातील यावर विचार करण्याचा आहे. कठोर नियंत्रणाशिवाय चौकटीने सात व्यापक सूत्रे निश्चित केली आणि जी धोरणकर्ते आणि उद्योग या दोघांनाही मार्गदर्शन करतील. यामध्ये विश्वास हा पाया, पीपल फर्स्ट म्हणजे लोक सर्वोपरी, संशोधनापेक्षा संयम महत्त्वाचा आणि समानता आणि जबाबदारी यांचा समावेश आहे. या सूत्रांचा यावर भर आहे, की एआय सिस्टीमनी मानवी निर्णय प्रक्रियेला पाठिंबा दिला पाहिजे आणि तरीही ते पारदर्शक आणि कोणतेही पक्षपात टाळून साध्य करता आले पाहिजे. या परिषदेचे सर्वात प्रमुख वैशिष्ट्य हे आहे, की सध्याच्या कायद्यावरील अवलंबितता. अधिकाऱ्यांनी सांगितले आहे, की अनेक एआयशी संबंधित धोके हे सध्याच्या कायदेशीर चौकटीत समाविष्ट आहेत आणि त्यात आयटी नियमावली आणि गुन्हेगारी कायदे यांचा समावेश आहे. या मार्गदर्शक तत्वांत असे सांगितले आहे, की एआय डेव्हलपर्स आणि डिप्लॉयर्सकडून काय अपेक्षा आहे. संशोधनाला प्राधान्य देऊन सरकारने केवळ ते एआयचा प्रमुख वापर करणारे नाही तर जबाबदार आणि समावेशक कारभार जो भारताचा २०४७ साली साकार होणारा विकसित भारत दृष्टिकोन साध्य करणारा असेल असे सिद्ध करू पाहत आहे. एआयचा उपयोग विविध कारणांसाठी होतो आणि हेच या परिषदेचे सार आहे. रोजगार, भाषा, नवीन रोजगार मिळवणे, सार्वजनिक सेवा आणि सामान्य लोकांना लाभप्रद होतील अशा योजना राबवणे यासाठी एआयचा उपयोग कसा करता येईल या दृष्टीने या परिषदेत विचार केला जात आहे. ब्रिटनचे उपपंतप्रधान डेव्हीड लॅमी आणि एआय मंत्री कनिष्क नारायण हे भारतात आलेल्या शिष्ट मंडळात आहेत. त्यांनी सांगितले, की एआयचा उपयोग करून रोजच्या जीवनात कसा सामान्याना लाभ करून देता येईल आणि जगाच्या प्रत्येक कोपऱ्यात एआयचा उपयोग करून डॉक्टर त्वरीत रोगनिदान करतील, शिक्षक शिकवण्यात नवनवीन पद्धती आणतील आणि परिषदा सेवा झटपट देऊन उद्योग नवीन जनरेशनचे रोजगार तयार करतील हे पहाण्यासाठी एआयचा वापर केला जाईल. एआय हे अभूतपूर्व वचन देते की जागतिक आव्हानांना जसे की सार्वजनिक आरोग्य आणि शिक्षण आणि शेतीत उत्पादकता वाढवणे आणि त्यासोबतच मानवी हक्कांचा आदर करणे याबाबत क्रांतिकारी आहे. एआय पद्धतींचा वापर जर उपयोगकर्ते आणि विकासक यांच्यामार्फत झाला तर समाजाला त्याचा शेवटी प्रचंड लाभ होऊ शकतो. जगात सर्वात जास्त लोकसंख्या असूनही भारतात सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे आणि डिजिटल बाजारपेठांपैकी ती सर्वात वेगाने वाढणारी आहे. मानवता, समावेशक वाढ आणि शाश्वत विकासासाठी एआयचा उपयोग केला पाहिजे असे जे भारताचे इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले ते अगदीच योग्य आहे. ही शिखर परिषद राष्ट्रीय क्षमता, आर्थिक लवचिकता आणि दीर्घकालीन क्षमतांचा सक्षम देश म्हणून भारताची ओळख निश्चित करेल.

# स्पर्शाची दुनिया सारी

स्पर्श म्हणजे जाणीव जागृतींचा काही वेळेसाठी घडलेला सहवास. कळत नकळत होणारा हाताचा हाताशी समेट, शरीराने शरीराला हलकासा दिलेला झोका त्यातून मन पाखरू पाखरू शहारत गेलेला भावनिक गुंतागुंतीचा ओझरता मखमली स्पर्श जणू काही हर्षचं. स्पर्शाला जाणीव आसक्ती जडता भौतिक सुखाच्या मोहमयी ओलाव्याची संवेदनशील छाया असं देखील म्हणता येईल. गरम, मऊ, खरखरीत, ऊबदार या भौतिक संवेदनेत स्पर्शाची सुबक व्याख्या सापडेल. नितळ त्वचेला सुखावणारी संवेदना कधी हवा, पाणी, वस्तूंच्या स्पर्शातून, तर कधी आपुलकी विश्वासाच्या समेवर भावनिक सौम्य स्पर्शाची अनुभुती देईल. सौहार्द प्रेमातून आलेली भावना सहवासायोगे मनाला आधार देत जगण्याची उभारी घेईल. नाजूक शरीराची नाजूक त्वचा स्पर्श संवेदनेचं महत्वाचं अंग असल्याने वरचेवर ते जागृत होईल. मनाला मनाची, सुखाला सुखाची, शरीराला शरीराची कायम ओढ राहील. मानवासाठी स्पर्शाचा अर्था अर्थी संबंध इथून तिथून सारखाचं असल्याने स्पर्शाच्या पहिल्याच पायरीवर असलेला मातेचा उबदार स्पर्श आठवा, जो जगातल्या सर्वोत्तम वेदनेला आश्वासक ऊब देतो. प्रसूती वेदनेनंतर ममत्व जागृती स्पर्शाने आईस पान्हा फुटतो. बाळ जन्मल्यानंतर आईचा परीस स्पर्श झऱ्यागत वाहू लागतो. लोण्यागत मऊशार कुशीतली ऊब हवीहवीशी वाटू लागते. आई म्हणजे ममत्व. आई म्हणजे जगण्याचं एकमेव ठिकाण. विश्वासाचं हक्काचं पान, अशावेळी स्पर्शाची भावना जितकी नाजूक तितकीचं ती संवेदनशील होते. भाव भावनांचे विविधांगी पदर यात अनुभवास येतात. भावनेच्या अत्युच्य अविष्काराकडे मन ओढलं जात. आयुष्यातला दुसरा माऊली स्पर्श पंढरपूरी विठोबारायाच्या पद स्पर्शाची ओढ लावणारा, भक्तिपुरात दंग करणारा. चराचरात वसलेल्या पांडुरंगाची आस अंतरंग स्पर्शून जावी या प्रतीक्षेत भक्त असतो. ज्ञानामृताच्या स्पर्शासाठी तन मन धन सगळं विसरून जातो. त्यासमयी सोहळा पालखीचा नयनी साठवावा, माऊली पदस्पर्श आशीर्वाद घ्यावा म्हणत अख्खी पंढरी दुमदुमते. जगण्याच्या असंख्य वाटांवर अनेक स्पर्शांचे कळत नकळत आधार घेत आपण पुढे जात असतो. त्या त्या वेळी ते ते स्पर्श मोलाची कामगिरी करत असतात, जेणेकरून पुढे जाऊन वेदनाही सुखावह होते. वेदनेला उमजे, मायेचा पदर... स्पर्शाची भाषा, शब्दातीत सादर. बऱ्याचं अंशी हे स्पर्श आपण गृहीतचं धरून चालतो. परंतु त्यांना मुकल्यानंतर त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आयुष्यात जाणवू



लागते आणि हलक्याशा भावभरल्या स्पर्शासाठी मन आसुसते. तेव्हा काय काय दाटून येतं ठाऊक आहे का? नात्यात पडलेली वजाबाकी आठवते. भाग काढून घातलेला विचित्र गुणाकार साठू लागतो आणि कळू लागत बेरजेचं गणित. स्पर्शाची दुनिया सारी, भावार्थ सांगून जाती, स्पर्शाभोवती हळवी, वसती नाजूक नाती... पुढे स्पर्शाच्या उतरंडीमध्ये वरच्या स्थानावर ज्याची वर्णी लागते तो म्हणजे पारदर्शी मैत्रीचा नितळ आरस्पानी स्पर्श होय. ज्याला स्त्री पुरुष भेदाभेद वय, प्रांत, भाषा अशी कोणतीही भिंत अडवू शकत नाही. मैत्री करून पाहावी आणि तेवढीचं निभवावी. दुर्बिणीतून न्याहाळावी तशी स्पर्शाची विविध रूपं समोर येऊ लागतात. स्पर्श नजरेचाही असतो. आश्वासक, आधार देणारा, जपणारा, जोजवणारा, आनंदयात्री, डोळ्यांत आसवं आणणारा, घाबरणारा, घाबरवणारा, किळसवाणा, ओंगळ नजरेचा स्पर्श प्रत्यक्ष शरीर स्पर्शापेक्षाही प्रभावी ठरतो. तान्ह्या बाळाचा स्पर्श हा पृथ्वीतलावरील सर्वात लडीवाळ मुलायम स्पर्श होय. मलिनतेच्या लाटांपासून दूर असलेला पवित्र निसर्गाचा स्पर्श. थंडीच्या दिवसात अंगाशी लगट करणारे बोचरे वारे आठवून पाहा. आठवून पाहा पावसाच्या पहिल्या थेंबाने रोमांचित झालेले मन...अख्खा श्रावण मनासह शरीर कार्यान्वित करतो. नेहमी वरच्या क्रमांकावर असलेला, दाटीवाटीच्या युगल मिठीत, लग्नगाठ बांधण्यासाठी सरसावलेला चोर स्पर्श. प्रेमाची भेट प्रेमाच्या गाठी ओलावा संपताच उरत नाहीत पाठी... आठवांचा खेळ उगा मागे उरतो, रागरूसव्यात जो तो गुदमरतो... त्याच्या-तिच्या सानिध्यातील आठवून पाहा संध्याकाळ... पहिली भेट, मावळतीचा सूर्य... बोचणारा वारा, नजर गुपित, घट्ट धरलेला हात! मनीची भाषा, अवगेल का त्याला? तूच माझी राणी, तो त्या दिवशी म्हणाला... हाती तुझा हात दे काहीतरी गुणगुणला... तू फक्त हो म्हण, तो हरपला... हीच माझी ओढ अन्, हाच खरा जिवलग... मी ही लाजून हो म्हंटल जरा! तो म्हणाला, भेटीत हवा विश्वास ज्याने वाढेल सहवास... सहवासावर रचू सुखाचा संसार... स्पर्श करता वेलीला येई आकार. तूच माझी राणी अन् मी तुझा सखा... सुखी जीवनात सहवासी स्पर्श हवा. निसर्गाने स्पर्शाची एक सुंदर देणगी आपल्याला बहाल केलेली आहे. स्पर्श म्हणजे अभिव्यक्तीचे एक सशक्त माध्यम. विशेष उल्लेखनीय म्हणजे घरातील, समाजातील, वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना कपडालत्ता, औषध, पैसा, अन्नपाणी या गोष्टी पलीकडे आसं असते मायेच्या संवादाची. आपले म्हणणे मांडण्याची, दुसऱ्याचे ऐकण्याची आणि सर्वांच्या पलीकडे एक खोल आस असते स्पर्शाची. घरातील ज्येष्ठांना असा स्पर्श आपण मागे कधी केलाय का? आठवून बघा. नसेल ना आठवत...! तर एक गोष्ट करा. त्यांच्याजवळ बसा. त्यांचा हात आपल्या हातात घ्या. डोक्यावरून मायेने हात फिरवा, आणि पहा साधे वाटणारे स्पर्श काय काय किमया करतात ते. निसटून गेलेल्या स्पर्शाचे सुरेख पैलू अनुभवून तर पहा. केवळ स्पर्शाने चमत्कार झाल्याची अनेक उदाहरणे देता येतील. विस्मृतीत गेलेल्या स्पर्श अनुभूतीच्या आठवणीत आपला दिवस गोड जावा म्हणून हाती घेतलेल्या मोरपंख ललितबंध लिखाणावरील दौतस्पर्श आपल्या सेवेशी सादर आहे.

# ८०हजार रुपये,मौल्यवान दागिने यासह पर्स वापस

**अंबाजोगाई ।** प्रतिनिधी

क्रांतीनगर अंबाजोगाई येथील खलील रफिक शेख यांचा प्रामाणिक पणा मुळे डोंगर पिंपळा येथील रहिवासी असलेल्या राधा पवार या दि १७ फेब्रुवारी रोजी चनई परिसरात मुलाच्या लघुशंका निमित्ताने थांबल्या या गडबडीत त्या ती पर्स विसरून गेल्या. पण खलील यानी कसलीही लालूच न दाखवता सरळ पोलीस ठाण्यात सदर पर्स रोख रक्कम ८० हजार व मौल्यवान दागिन्यांसह जमा केली त्यासाठी खलील यांचे पोलिस ठाण्यात प्रामाणिक पणाचे कौतुक केले त्यासाठी सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# पान १ वरून

## राजधानी दिल्ली...

यांची प्रेरणा निर्माण करणारा ठरणार आहे. बीड शहरासह तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक राजे संभाजी प्रतिष्ठानचे अध्यक्ष, मराठा सेवक गंगाधर काळकुटे पाटील यांनी केले आहे. शिवजयंतीच्या निमित्ताने बीडमध्ये पारंपरिक संस्कृतीचा आणि शौर्याचा हा सोहळा उत्साहात साजरा होणार असून नागरिकांमध्ये याबाबत मोठी उत्सुकता दिसून येत आहे.

## एकाही बिअर बारला...

दिली आहे. बीड जिल्ह्यात दारू दुकानांमुळे अनेक कुटुंब उध्वस्त झाले आहेत. त्यामुळे आम्ही सातत्याने आतापर्यंतच्या सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडे नवीन बियर बार लायसन देऊ नका, म्हणून मागणी करत असतो. दारूने नुकसान होऊ नये, हा त्या पाठीमागचा हेतू असतो. प्रलंबित असलेल्या अनेक अर्जांपैकी काही अर्ज आजच्या बैठकीमध्ये निकाली निघणार होते. बीड जिल्ह्यातील वाढती बेकारी आणि गुन्हेगारी लक्षात घेता समाज हितासाठी व्यसनाधीनता कमी होणे गरजेचे आहे. त्यामुळे ही मागणी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह राज्याचे उत्पादन शुल्क आयुक्त राजेश देशमुख यांचे कडे देखील करण्यात आली होती. आजच्या बैठकीमध्ये एकाही नवीन बियर बारला परवानगी देण्यात आलेली नाही. त्यामुळे जिल्हा प्रशासनाला धन्यवाद देत सामाजिक स्वास्थ्य जपणे, ही प्रशासनाची जबाबदारी असल्याने हा निर्णय पुढेही कायम ठेवावा, असे ॲड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

## कष्टाचे ९ लाख...

९ लाख रुपये रोख आणि सोन्याचे दागिने घेऊन चोरटे पसार झाले. सकाळी उठल्यावर घरातील साहित्य अस्ताव्यस्त पडल्याचे पाहून कोठुळे कुटुंबाला चोरी झाल्याचे लक्षात आले. गावातील वीजपुरवठा जाणीवपूर्वक खंडित करून घरफोडी करणे, ही पद्धत पाहता यामागे परिसरातीलच किंवा विद्युत कामाची माहिती असणार्या एखाद्या जाणकार गुन्हेगाराचा हात असावा, असा संशय व्यक्त होत आहे.

## कार्यक्रमांची ठरली...

बंधुता आणि संविधान मूल्यांचा जागर व्यापक करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. जयभीम महोत्सवात समताज्योत धम्मदेसना, विचारप्रबोधनपर व्याख्याने, अभिवादन रॅली, सामाजिक आशयाच्या नाटिका, महापुरुषांवरील सामान्य ज्ञान स्पर्धा, लेझीम पथक, मिरवणूक देखावे, रक्तदान शिबिर, विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. युवक-युवती, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग राहावा यासाठी स्वतंत्र नियोजन करण्यात आले आहे. बैठकीस जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, सदस्य आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन महोत्सव यशस्वी करावा, असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिवजन्म : स्वराज्याच्या सूर्याचा उदय

महाराष्ट्राच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव म्हणजे पराक्रम, दूरदृष्टी, न्यायप्रियता आणि लोकाभिमुख राज्यकारभाराचे तेजस्वी प्रतीक होय. फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१, म्हणजेच १९ फेब्रुवारी १६३० रोजी पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील शिवनेरी या दुर्गम पण सुरक्षित किल्ल्यावर या तेजस्वी सूर्याचा जन्म झाला. आई जिजाऊंच्या संस्कारातून आणि शाहाजी राजांच्या पराक्रमातून घडलेले हे व्यक्तिमत्त्व पुढे संपूर्ण भारताच्या इतिहासात अजरामर झाले. जिजाऊंनी बालशिवबाला रामायण, महाभारत आणि पुराणातील पराक्रमी वीरांच्या कथा सांगून त्याच्या मनात स्वराज्याची बीजे रोवली.



अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा, धर्मनिरपेक्ष विचारसरणी आणि प्रजेवर प्रेम करण्याची वृत्ती याच संस्कारातून शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात दृढ झाली. बालपण आणि स्वराज्याचे स्वप्न : - शिवाजी महाराजांचे बालपण मावळातील कठीण पण प्रेरणादायी वातावरणात गेले. दादोजी कोंडदेव यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी युद्धकौशल्य, शस्त्रविद्या आणि राज्यकारभाराची प्राथमिक तत्त्वे आत्मसात केली. सह्याद्रीच्या कुशीत वाढलेल्या या बालराजाच्या मनात स्वराज्याचे स्वप्न आकार घेत होते. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे या विचाराने त्यांनी पुढील आयुष्याचा मार्ग निश्चित केला. स्वराज्याची पायाभरणी : - १६४५ साली रायरेश्वराच्या मंदिरात शिवाजी महाराजांनी आपल्या मावळ्यांसमोर स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली . हा क्षण महाराष्ट्राच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो . त्यानंतर त्यांनी तोरणा किल्ला जिंकून स्वराज्याच्या पहिल्या विजयाची नोंद केली. पुढे राजगड , पुरंदर , कोंढाणा, जावळी अशा किल्ल्यांवर विजय मिळवत त्यांनी स्वराज्याचा विस्तार सुरू ठेवला. पन्हाळगड ते विशाळगड : बाजीप्रभूंचा पराक्रम - १६६० मध्ये सिद्दी जौहरच्या वेढ्यातून पन्हाळगडातून सुटताना महाराजांना विशाळगड गाठायचा होता. पावनखिंडीत बाजीप्रभू देशपांडे यांनी प्राणाची आहुती देत शत्रूला अडवले आणि महाराजांना सुरक्षित विशाळगड गाठता आले. जोपर्यंत विशाळगडावर तोफांचे तीन आवाज येत नाहीत, तोपर्यंत ही खिंड सोडायची नाही हा बाजीप्रभूंचा निर्धार स्वराज्यनिष्ठेचे सर्वोच्च उदाहरण ठरला. आग्रा सुटका : धाडस आणि बुद्धीचे अद्वितीय मिश्रण -१६६६ मध्ये औरंगजेबाने शिवाजी महाराजांना आग्रा येथे नजरकैदेत ठेवले. परंतु महाराजांनी आपल्या चातुर्याने आणि धाडसाने कैदेतून सुटका करून घेतली. मिठाईच्या टोपल्यांतून बाहेर पडत त्यांनी दिल्लीच्या सामर्थ्याला चकवा दिला. ही घटना इतिहासातील सर्वात धाडसी सुटका मानली जाते. राज्याभिषेक : स्वराज्याचा सुवर्णक्षण - ६ जून १६७४ रोजी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. हा केवळ एका राजाचा राज्यारोहण नव्हता , तर स्वराज्याच्या स्वप्नाची प्रत्यक्ष पूर्तता होती. हिंदवी स्वराज्याची स्थापना अधिकृतपणे घोषित झाली. राज्याभिषेकानंतर शिवाजी महाराजांनी प्रशासन अधिक संघटित केले. अष्टप्रधान मंडळाची स्थापना करून त्यांनी सुबक आणि जबाबदार राज्यकारभाराची पायाभरणी केली. शिवजयंतीचे महत्त्व : - छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती म्हणजे स्वराज्य , स्वाभिमान आणि न्यायाचे स्मरण करणारा दिवस होय. महाराष्ट्रात आणि देशभरात हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, शासकीय कार्यालये आणि गावपातळीवर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. शिवचरित्र वाचन, पोवाडे, मिरवणुका, व्याख्याने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे महाराजांच्या कार्याची आठवण करून दिली जाते . विविधतेतून एकतेचा संदेश : - शिवाजी महाराजांचा इतिहास हा केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही. त्यांनी संपूर्ण भारतात स्वराज्य आणि स्वाभिमानाची प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांमधून धर्मासाठी नव्हे, तर धर्मरक्षणासाठी राज्य ही संकल्पना दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराज जयंती हा केवळ उत्सव नसून प्रेरणेचा आणि आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. त्यांच्या आदर्शांचा वारसा जपून समाजकारण, राष्ट्रकारण आणि मानवतेच्या सेवेसाठी काम करणे हीच खरी शिवजयंती ठरेल. जगदंब जगदंब म्हणत उभा ठाकला सिंह , स्वराज्याचा ध्वज फडकविला सह्याद्रीच्या शिखरांवरी छत्रपती शिवाजी महाराजांचे तेजस्वी जीवन आजही प्रत्येक भारतीयाच्या मनात स्वाभिमानाची ज्योत पेटवत राहते .

जय भवानी , जय शिवाजी !

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**

तहसीलदार, बीड

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र

## आष्टी मतदार संघाच्या अर्थव्यवस्था बळकटीकरणासाठी मा.आ.भिमराव धोंडे यांच्या संकल्पनेतील सलग तिसऱ्यांदा भव्य कृषी प्रदर्शन...

# उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते होणार उद्घाटन

- २०० पेक्षा अधिक कंपन्या, आधुनिक शेती तंत्रज्ञान, प्रगत खते व बियाणे, तज्ञ मार्गदर्शन
- प्रमुख आकर्षक चायना चा सुलतान, आधुनिक तंत्रज्ञान आणि शेतीपूरक व्यवसायासह सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी



**आष्टी । प्रतिनिधी**

आधुनिक तंत्रज्ञान आणि शेतीपूरक व्यवसायामुळे ग्रामीण भागासह शहराच्या मतदारसंघाच्या अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी नवे तंत्रज्ञान, नवे विचार आणि समृद्ध शेतीकडे वाटचाल या ध्येयवाक्याने प्रेरित होऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते आष्टी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार भीमरावजी धोंडे यांच्या संकल्पनेतून मागील ३ वर्षापासून सलग भव्य कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत असून लाखो नागरिक या प्रदर्शनात भेट देऊन व्यवसायाकडे वळतात. या प्रदर्शनाचा बेरोजगार तरुणांसह शेतकरी व नागरिकांना फायदा होतो. याच उद्देशाने सलग तिसऱ्या वर्षी देखील आष्टी येथे राज्यस्तरीय भव्य डॉ.स्वामीनाथन कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून ५ दिवस हे कृषी विषयक प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी आनंदपर्वणी ठरणार आहे. शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले आहे. आष्टी येथील औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी मंगळवारी दि.१७ फेब्रुवारी रोजी याबाबत माहिती दिली १९ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी दरम्यान भव्य कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या कृषी प्रदर्शनाचे उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून राजकीय नेते, विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. २०० पेक्षा अधिक कंपन्या, आधुनिक शेती, नवीन तंत्रज्ञान, खते व बियाणे, तज्ञ मार्गदर्शन, प्रदर्शनीमध्ये १००ते१५० हून अधिक दालने राहणार आहेत. कृषीप्रदर्शन राज्यातील शेतकऱ्यांसाठी आनंदाची पर्वणी ठरणार आहे.

# सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्या अमित राठोडची विझी क्रिकेट ट्रॉफीसाठी निवड

### पश्चिम विभागीय विद्यापीठ संघात फलंदाज म्हणून संधी ; गोव्यात होणाऱ्या स्पर्धेसाठी तयारी सुरू



**बीड । प्रतिनिधी**

सौराष्ट्र विद्यापीठ, राजकोट येथे पार पडलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धे नंतर पश्चिम विभागीय विद्यापीठ क्रिकेट संघ जाहीर करण्यात आला असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरच्या संघातून खेळणाऱ्या सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्या क्रिकेटपटू अमित राठोड याची फलंदाज म्हणून निवड झाली आहे. अमित राठोडने स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाजी करत आपल्या कामगिरीच्या जोरावर पश्चिम विभागीय विद्यापीठ संघात स्थान मिळवले आहे. पुढील स्पर्धेच्या तयारीसाठी तो सध्या सौराष्ट्र विद्यापीठ, राजकोट येथे आयोजित सराव शिबिरात सहभागी झाला आहे. २८ फेब्रुवारीपासून गोवा येथे विझी क्रिकेट ट्रॉफी स्पर्धा आयोजित करण्यात येणार असून, ही आंतरविभागीय विद्यापीठ एकदिवसीय पुरुष क्रिकेट स्पर्धा आहे. अखिल भारतीय विद्यापीठ खेळ संघटना (AIU) व भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (BCCI) यांच्या सहकार्याने या स्पर्धेचे आयोजन केले जाते. ही स्पर्धा गोवा क्रिकेट असोसिएशन अकादमी, पोरवोरिम तसेच पणजी जिमखाना मैदान, पणजी येथे होणार आहे. अमित राठोडच्या या यशाबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर, सहसचिव डॉ. दीपाताई क्षीरसागर, सचिव डॉ. योगेश क्षीरसागर, संचालक तथा नगरसेविका डॉ. सारिका क्षीरसागर, प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, प्राचार्य शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. अन्सरउल्ला खान, उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. भागचंद सानप तसेच शारीरिक शिक्षण विभागातील डॉ. शेख शकील, डॉ. ज्ञानेश्वर घोडके,

# सरस्वती विद्यामंदिर, शिवाजीनगर बीडचे माझी आई नानीबाई आदर्श माता पुरस्कार जाहीर




**बीड । प्रतिनिधी**

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तसेच आपल्या पाल्यास सर्व गुण संपन्न बनवून देशाचा एक आदर्श भावी नागरिक घडवणाऱ्या मातांचा ज्येष्ठ शिक्षक नेते तथा सरस्वती विद्यामंदिरचे संस्थापक सचिव मा. श्री. उत्तमराव पवार सर यांच्या मातोश्री नानीबाई पवार स्मरणार्थ दिले जाणारे सण २०२६ चे माझी आई नानीबाई आदर्श माता पुरस्कार जाहीर झाले असून सदरील पुरस्कारांचे वितरण दिनांक २१/०२/२०२६ वार शनिवार रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता सरस्वती माध्यमिक विद्यामंदिर शिवाजीनगर बीड येथे प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येऊन आदर्श मातांचा गौरव करण्यात येणार आहे.

सन २०२६ च्या माझी आई नानीबाई आदर्श माता पुरस्कार यामध्ये सौ. सविता मोहनराव रणदिवे (अकलूज) विशेष पुरस्कार तसेच सौ. कांता संतोष सोनवणे (झडख बीड) विशेष पुरस्कार तसेच सौ मीनाक्षी भास्कर वडमारे, श्रीम. सविता मनोहर पंडीत, सौ शकुंतला किसन शीलवंत, सौ सुषमा भाऊसाहेब शिंदे, सविता रामेश्वर कैतके, सौ कौशल्या सुदामराव वाघ, सौ बालिका महादेव सिरसाट व सौ ज्योती नंदकुमार ऊघाडे या दहा आदर्श मातांना कार्यक्रमाच्या दहाव्या वर्षाचे औचित्य साधत पुरस्कार जाहीर झाले आहे..

सर्व आदर्श मातांचे सरस्वती विद्यामंदिर चे संस्थापक सचिव माननीय श्री उत्तमराव पवार संचालक मा.श्री बाबुलाल पवार यांच्यासह सर्व संचालक मंडळासह सरस्वती विद्यामंदिर चे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व पालक व विद्यार्थ्यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

# कांद्याच्या पिकात अफूची शेती; साडेपाच लाखाची झाड जप्त



**केज । प्रतिनिधी**

कांद्याच्या पिकात अफूची शेती केली जात असल्याचा प्रकार युसुफ वडगाव पोलीस ठाणे हद्दीतील सातेफळ येथे उघडकीस आला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करून साडेपाच लाख रुपये किमतीची साडेतेरा किलो अफूची झाड जप्त केली. दि.१७ फेब्रुवारी रोजी बन्सी घाडगे यांच्या सातेफळ येथील घाडगे वस्ती जवळील शेतात कांद्याच्या पिकामध्ये अफूची लागवड केल्याची गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाल्या वरून दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास छापा मारला. त्यावेळी बन्सी महादेव घाडगे याने त्याच्या शेतातील कांद्याच्या पिकात लावलेले अफूची झाडे आढळून आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने, केज तहसीलचे नायब तहसीलदार अशोक भंडारे, महसूल मंडळ अधिकारी दयानंद मस्के, सहाय्यक कृषी अधिकारी गणेश पारखे, सहाय्यक कृषी अधिकारी सुदर्शन शेळके यांच्या समक्ष अफूची झाडे उपटून त्यांचे वजन केले असता त्याचे वजन साडेतेरा किलो ग्रॅम असल्याचे आढळून. त्याची बाजार किंमत साडेपाच लाख रु. एवढी आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलिस अधीक्षक चेतना तिडके आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकट राम यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलिस नाईक दिलीप गित्ते, पोलिस नाईक भागवत शेलार महेश जोगदंड, दीपक खांडेकर, गणेश मरांडे यांच्यासह युसुफवडगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे, पोलिस उपनिरीक्षक भिमराव मांजरे यांनी कारवाई केली.या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेने अफूची लागवड करणारा शेतकरी बन्सी महादेव घाडगे याला ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी युसुफवडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे

# अंथरवन पिंपरी आश्रम शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

बीड पासून जवळच श्री सद्गुरु बंजारा सेवा संघ संचलित, प्राथमिक-माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा अंथरवण पिंपरी (तांडा) ता.बीड ही शाळा नावाजलेली आहे. या शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला वाव मिळावा म्हणून विविध उपक्रमाचे आयोजन केले जाते. दि.१३ फेब्रुवारी रोजी श्री छत्रपती संभाजीनगर व परिसरात ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या. प्रार्थमिक विभागाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल अतिशय उत्साहात व खेळीमेळीच्या आनंददायी वातावरणात संपन्न झाली. अंथरवन पिंपरी तांडा येथून सहल निघाली सर्वप्रथम बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग म्हणून प्रसिद्ध असलेल्या घृष्णेश्वर मंदिर वेरूळ येथील शंभू महादेवाचे दर्शन घेण्यात आले. तदनंतर वेरूळ येथील जगप्रसिद्ध लेण्याला भेट देऊन विद्यार्थ्यांना त्याबद्दल माहिती देण्यात आली. भव्य दिव्य लेण्या पाहून चिमुकल्या विद्यार्थ्यांना अनेक प्रश्न पडत असत, त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांच्या शंकेचे निरसन करण्यात आले. त्यानंतर खुलताबाद येथील भद्रा मारुतीचे दर्शन घेण्यात आले. त्यानंतर बीबी का मकबरा या ठिकाणी भेट देऊन त्या वास्तूचे महत्त्व विद्यार्थ्यांना विशद केले.

# काळाबरोबर कलावंतानी बदललं पाहीजे: डॉ. दीपा क्षीरसागर

### सौ.के.एस.के. महाविद्यालयात अभिनय तंत्र : नाटक आणि सिनेमा कार्यशाळा संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

काळाबरोबर कलावंतानी बदललं पाहीजे, नवनविन तंत्राचा वापर आत्मसात करुन त्यांचा वापर आपल्या अभिनय कौशल्यात, दिग्दर्शकीय पध्दतीत केला पाहीजे. नवनविन तंत्र आणि आताची गरज याची सांगड घालून कलावंतानी आपल्याला सिध्द करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ. दीपाताई क्षीरसागर यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात सांगीतले. सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड येथे अभिनय तंत्र –नाटक आणि सिनेमा या विषयावर एकदिवसीय कार्यशाळ संपन्न झाली. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सिनेमॅटोग्राफर, दिग्दर्शक श्री. भूषण खोडके हे होते तर उद्घाटन नाटय परिषद अध्यक्ष तथा नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर व कार्यशाळा समन्वयक उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर मंचावर उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ आणि महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी ही कार्यशाळा घेण्यात आली. अभिनय तंत्र : नाटकातील आणि कॅमेरासमोरील अभिनय यावर कार्यशाळेत सखोल चर्चा व प्रात्यक्षीके घेण्यात आली. श्री.भूषण खोडके, प्रा. असलम शेख यांनी कॅमेरा त्यातील लेन्स, झुम व्हाईट, मीड, लाँन्गशॉट, क्लॉजशॉट, मीडशॉट, दिग्दर्शन, डबींग, एडीटींग, कथा, पटकथा यावर मार्गदर्शन केले. तर शॉट फिल्म कशी बनवावी व कोणत्या तंत्राचा वापर करावा याविषयी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. याशिवाय काही ऑस्कर विनर चित्रपटातील दृश्य व काही महत्वाच्या शॉटफिल्म देखील दाखवण्यात आल्या.

# समाजपरिवर्तनाचा महामेरू हरपला: डॉ.संभाजी शिंदे

### लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठानचे संस्थापक भाऊसाहेब सोनावणे यांना भावपूर्ण श्रद्धांजली



**बीड । प्रतिनिधी**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे क्रांतीकारी विचार जनमानसात रुजवणारे, समाजाला संघटित करून स्वाभिमानाची नवी ओळख निर्माण करून देणारे अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रल्हाद बाबुराव उर्फ भाऊसाहेब सोनावणे यांच्या निधनाने समाजकार्यातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. ३१ डिसेंबर २०२५ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या या अतुलनीय योगदानाचा कृतज्ञतापूर्वक गौरव करण्यासाठी आणि त्यांना आदरांजली वाहण्यासाठी अस्मिता प्रतिष्ठान व बीड जिल्ह्यातील समस्त समाज बांधवांच्या वतीने ८ फेब्रुवारी २०२६ रोजी अस्मिता फंक्शन हॉल येथे एका श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते.

# सामाजिक उपक्रमांनी डॉ.प्रितमताई मुंडे यांचा वाढदिवस साजरा

### निस्वार्थी भावना समाजकल्याणाचे मुळ आहे: अखंडानंगिरी महाराज

**बीड । प्रतिनिधी**

जनसेवा हीच ईश्वरसेवा आहे नि:स्वार्थपणे लोकांची मदत करणे म्हणजेच प्रत्यक्ष देवाची पूजा आराधना करणे होय . समाजात प्रेम, सहकार्य आणि सहानुभूती वाढवून, गरजू लोकांना आधार देणारी ही उच्च मानवी भावना आहे हे तत्त्व सामाजिक एकता आणि सकारात्मक परिवर्तनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. समाजातील प्रत्येक माणसात, विशेषतः गरीब, दुःखी आणि गरजूंमध्ये ईश्वर वास करतो, त्यामुळे त्यांची सेवा म्हणजे थेट ईश्वराची आराधना होय. नि:स्वार्थ सेवा: कोणत्याही अपेक्षा न ठेवता समाजातील दुर्बल घटकांसाठी कार्य करणे, त्यांना स्वावलंबी बनवणे ही



खरी सेवा आहे. नि:स्वार्थ जनसेवेतून माणसाला आंतरिक शांती आणि सर्वोच्च समाधान मिळते.परमेश्वराने जे जिवन आपल्याला दिले ते आनंदाने व निर्व्यसनी पणे जगा व्यसनाच्या आहारी जाऊ नका असे उद्गार अखंडानंदगिरी महाराज यांनी केले. निमित्त होते बीड जिल्ह्याच्या दबंग माझी खासदार डॉ प्रितमताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त लोकनेते गोपिनाथराव मुंडे वृद्धाश्रम घाटसावळी व जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र घाटसावळी येथे विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .यावेळी भवानी गडाचे मठाधिपती अखंडानंदगिरी महाराज यांच्या हस्ते आश्रमातील २५ आजी ,आजोबा यांना कपडे आणि साड्या वाटप व जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र घाटसावळी येथे उपचार घेत असलेल्या रुग्णांना मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शिवाजीराव फड हे होते त्यांच्या समवेत भाजपा नेते चंद्रकांत फड, भगीरथ आबा बांडे, पंजाबराव काकडे, भाजपा ता. सरचिटणीस हरिष खाडे, उपाध्यक्ष संजय काळे, शामराव राऊत, अशोक वैद्य, बाळासाहेब डोळस, नितीन खाडे, बारीक कडेकर, राहुल आठवलेआदी प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चंद्रकांत फड यांनी केले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे २१ व २३ फेब्रुवारी रोजी मोफत नेत्र तपासणी शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील प्रसिद्ध उद्योगपती संतोष रमणलालजी बोथरा व त्यांच्या पत्नी सौ. सारिका संतोषजी बोथरा यांनी आपल्या लग्न वाढदिवसानिमित्त एक आगळावेगळा सामाजिक उपक्रम राबविण्याचा संकल्प केला आहे. वाढदिवस साजरा करण्याच्या पारंपरिक पद्धतीऐवजी सामाजिक दायित्व जपत त्यांनी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे.

दि. २१ फेब्रुवारी (शनिवार) व २३ फेब्रुवारी (सोमवार) २०२६ रोजी

स्थळ : आनंदऋषीजी हॉस्पिटल, बीड

वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ६

या दोन दिवसांत बीड शहर व आजूबाजूच्या परिसरातील दीडशेपेक्षा जास्त नेत्र रुग्णांची तपासणी करण्याचा बोथरा परिवाराचा संकल्प आहे. तपासणीदरम्यान रुग्णांना योग्य दृष्टी मार्गदर्शन व आवश्यक सल्ला दिला जाणार आहे.

लग्न वाढदिवस धूमधडाक्यात साजरा करण्याऐवजी समाजहिताचा विचार करून रुग्णसेवेचा संकल्प करणारा हा उपक्रम समाजासाठी आदर्श ठरत आहे. या शुद्ध व प्रेरणादायी कार्याबद्दल बोथरा परिवाराचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

जैन सोशल फेडरेशन, सकल जैन समाज बीड तसेच बोथरा परिवार यांच्या वतीने बीड तालुक्यातील व परिसरातील सर्व नेत्र रुग्णांना विनंती करण्यात येत आहे की, या मोफत नेत्र तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा.

अशा प्रकारचा सामाजिक जाणीवेतून साजरा होणारा वाढदिवस हा समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून बोथरा परिवाराचा हा आदर्श उपक्रम विशेष कौतुकास्पद आहे.

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६ ●

## घरकुल योजनेची जिल्हा प्रशासनाकडून क्रूर थट्टा!



## ग्रामस्थांना घरकुलासाठी २ लाखांचा निधी; डेमो हाऊससाठी १० लाखांचा खर्च

### जिल्हाधिकारी व सीईओंकडे तक्रार : डॉ. गणेश ढवळे



**बीड । प्रतिनिधी**

शासनाच्या घरकुल योजनेअंतर्गत बेघरांना साधारण दोन लाख रुपयांचे अनुदान दिले जाते; मात्र बीड जिल्हा परिषदेच्या आवारात उभारण्यात आलेल्या डेमो घरकुलासाठी तब्बल दहा लाख रुपये खर्च करण्यात आल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेश) यांनी केला आहे. याबाबत त्यांनी जिल्हाधिकारी बीड तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. घरकुल योजनेत केंद्र शासनाकडून सुमारे १ लाख २० हजार रुपये, राज्य शासनाकडून अतिरिक्त ५० हजार रुपये, मनरेगा अंतर्गत २६ ते २८ हजार रुपये आणि स्वच्छतागृहासाठी १२ हजार रुपये असे मिळून एकूण सुमारे दोन लाख रुपयांचे अनुदान दिले जाते. मात्र जिल्हा परिषद आवारातील डेमो हाऊससाठी ३१ जानेवारी २०२४ रोजी ४ लाख ९९ हजार २७८ रुपयांची वर्क ऑर्डर देण्यात आली. त्यानंतर ५ जानेवारी २०२६ रोजी आणखी ४ लाख ९९ हजार रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. अशा प्रकारे एकाच कामासाठी दोन टप्प्यांत सुमारे १० लाखांचा खर्च करण्यात आल्याचा आरोप आहे. उभारण्यात आलेल्या डेमो हाऊसमध्ये एक लहान हॉल व दोन छोट्या खोल्या असून दोन लोखंडी दरवाजे, दोन मोठ्या खिडक्या व एक छोटी खिडकी बसविण्यात आली आहे. घर पत्र्याचे असून सुमारे २१७ चौरस फुट बांधकामासाठी सहा कॉलम उभारण्यात आले आहेत. पत्र्याच्या घरासाठी स्लॅबसाठी लागणारे कॉलम उभारण्याची गरज काय, असा सवाल डॉ. ढवळे यांनी उपस्थित केला आहे. घरकुल मंजुरीपासून हप्ते खात्यावर पडण्यापर्यंत चिरीमिरी द्यावी लागते. शासनाकडून मंजूर ५ ब्रास वाळू प्रत्यक्षात मिळत नाही. हातात सव्वा लाख रुपये उरतात, त्यातून घर कसे बांधायचे? असा सवाल ग्रामस्थ करत असताना डेमो हाऊससाठी १० लाखांचा खर्च म्हणजे घरकुल योजनेची क्रूर थट्टा असल्याची संतप्त प्रतिक्रिया डॉ. ढवळे यांनी दिली आहे. सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

---

#### मराठवाडा स्तरीय बैलगाडा शर्यतीमध्ये

## 140 बैलगाडा प्रेमींचा सहभाग

### उमरीचा किताब मिळवला ‘जय हनुमान प्रसन्न’ बैलगाड्याने



**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील उमरी (बु) येथे दरवर्षी शिवजन्मोत्सवानिमित्त बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले जाते. यावर्षी बैलगाडा शर्यतीचे तिसरे वर्ष होते. या बैलगाडा शर्यतीमध्ये १४० बैलगाडा प्रेमींनी सहभाग घेतला होता. यावर्षीचा पहिला किताब ‘जय हनुमान प्रसन्न’ बप्पासाहेब गोवर्धन इंदुरे यांच्या बैलगाड्याने उमरीचा किताब जिंकला. शिवजन्मोत्सवानिमित्त उमरी येथे मराठवाडा स्तरीय बैलगाडा शर्यतीचे आयोजन दि. १७ रोजी शिवकेसरी मैदान येथे करण्यात आले होते. या बैलगाडा शर्यतीमध्ये १४० बैलगाडा प्रेमींनी सहभाग घेतला होता. बैलगाडा शर्यतीमध्ये एकूण वीस फेऱ्या घेण्यात आल्या. यामध्ये चार उपांत्यपूर्व फेऱ्या झाल्या तर शेवटी आठ बैलगाड्यांमध्ये अंतिम फेरी झाली. यामध्ये प्रथम आलेल्या बप्पासाहेब गोवर्धन इंदुरे यांच्या ‘जय हनुमान प्रसन्न’ या बैलगाड्यास उमरीचा प्रथम किताब देण्यात आला. त्यांना ३१ हजार १३१ रुपये कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आसाराम घायतिडक यांच्या हस्ते देण्यात आले. दुसरा किताब ‘म्हळसोकी प्रसन्न’ आकाश भैया हरगुडे (एम.एस. २२) यांना २१ हजार १२१ रुपये बैलगाडा शर्यत आयोजक कमिटी कडून देण्यात आले. तिसरे बक्षीस ‘जय हनुमान भारत चौधरी चेतक’ अमोल जाधव यांनी पटकावले. त्यांना ११ हजार १११ रुपये महादेव माने व मुंजाभाऊ घायतिडक यांच्या तर्फे देण्यात आले. चौथे बक्षीस ‘महारूद्र प्रसन्न’ हदगाव यांना ७ हजार ७७७ रुपये उद्धव पौळ व आरोही लेडीज एम्पोरियम, माजलगाव यांच्या वतीने देण्यात आले. पाचवा किताब मुजीद पठाण, बाबानगरचा ‘बल्या डॉन’ याने मिळवला. त्यांना ७ हजार ७७७ रुपये चेअरमन ज्ञानेश्वर आसाराम घायतिडक यांच्या वतीने देण्यात आले. सहावा किताब ‘नगद नारायण प्रसन्न’ आदिती गोरे यांनी पटकावला. त्यांना बळीराम सुखदेव घायतिडक यांच्या कडून ५ हजार ५५५ रुपये देण्यात आले. सातवा किताब ‘पब्लिक किंग रणवीर’ गोरख पणकुठे यांनी जिंकला. त्यांना ४ हजार ४४४ रुपये परमेश्वर इनामकर व आबासाहेब सोनवणे यांच्या कडून देण्यात आल.

---

## शिवसेना जिल्हा प्र: संत भगवानबाबा प्रतिष्ठान परिसरातील हिंदू स्मशानभूमीला मिळाले अधिकृत पी.आर. कार्ड

### जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या पाठपुराव्या मुळे स्मशानभूमीची ३ एकर ६ गुंठे जागा वाचली



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील संत भगवानबाबा प्रतिष्ठाण परिसरातील हिंदू स्मशानभूमीवर काही समाजकंटकांकडून अतिक्रमण करण्यात येत होते. मात्र शिवेसना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी हे प्रकरण पोलिस आणि प्रशासनासमोर आणून समाजकंटकांचा डाव हाणून पाडला. दरम्यान जिल्हाप्रमुख मुळूक यांनी नगरपालिका प्रशासन व भूमिअभिलेख कार्यालयाकडे दीड वर्ष कागदपत्रांची लढाई केल्यानंतर अखेर अधिकृत शासकीय मोजणी होऊन हिंदू स्मशानभूमीला अधिकृत ३ एकर ६ गुंठ्याचे (१२६०० चौ. मि.) पीआर कार्ड मिळाले आहे. दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी बुधवारी (दि.१८) मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्याकडे हिंदू स्मशानभूमीचे पी आर कार्ड सुपूर्द केले. यावेळी उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, नगरसेवक दत्ता जाधव उपस्थित होते. सदर स्मशानभूमीत हिंदू व सर्वधर्मियांचे अंत्यविधी पार पडतात. दोन वर्षांपूर्वी स्मशानभूमी च्या जागेवर अतिक्रमणाचा प्रयत्न होत असल्याचा प्रकार उघडकीस आला होता. या अतिक्रमणा बाबतीत सचिन मुळूक यांनी कठोर भूमिका घेत तातडीने पोलिस व प्रशासनाकडे धाव घेत प्रकरण निदर्शनास आणून दिले. जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी योग्य पावले उचलत प्रचंड संयमाने प्रकरण हाताळले त्यामुळे संभाव्य जातीय सलोखा अबाधित राहिला.या प्रकरणी पोलिसांनी संबंधित संस्था व व्यक्तींना नोटिसा बजावून तंबी दिली तसेच प्रतिबंधात्मक कारवाई केली. त्यानंतर स्मशानभूमीची अधिकृत नोंद व्हावी यासाठी मुळूक यांनी भूमिअभिलेख कार्यालयाकडे पी.आर. कार्डसाठी प्रस्ताव सादर केला होता. सुमारे दीड वर्षांच्या पाठपुराव्यानंतर आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर संत भगवानबाबा प्रतिष्ठाण परिसरातील हिंदू स्मशानभूमीची ३ एकर ६ गुंठे जागेची भूमिअभिलेख कार्यालयात अधिकृत नोंद करण्यात आली असून नगरपालिकेला पी.आर. कार्ड प्रदान करण्यात आल.

---

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने भव्य रक्तदान व सर्व रोग निदान शिबिर संपन्न



**पाटोदा । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने भव्य रक्तदान व सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.शिबिरामध्ये मोठ्या संख्येने युवक-युवतींनी स्वेच्छेने रक्तदान करून मानवतेचा संदेश दिला. तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. विविध आजारांचे निदान, हाडे,रक्तदाब, शुगर,हिमोग्लोबिन तपासणी आदी सेवा तज्ज्ञ डॉक्टरांकडून देण्यात आल्या.समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, छत्रपतींच्या विचारांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा आमचा प्रयत्न आहे. रक्तदान हेच जीवनदान असून प्रत्येकाने अशा उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष नगरसेवक संतोष जाधव यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहिलेल्या सर्व रक्तदाते,नागरिक, डॉक्टर व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्सव समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व वैद्यकीय पथक यांनी परिश्रम घेतले.

---

## छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या अनुषंगाने जिल्हा नियोजन सभागृहात डॉ. राहूल गिरी यांचे व्याख्यान संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.१५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात डॉ. राहूल गिरी यांचे छत्रपती शिवाजी महाराज सर्व समावेशक राज्यकर्ता या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी तसेच संबधित अधिकारी, कर्मचारी, नागरिक, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.



महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यकर्तृत्व व शौर्यावर आधारीत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मुख्य कार्यक्रम दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.०० वाजता जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे शासकीय महापुजन होणार असून या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, पोलीस अधिक्षक नवनित कॉवत, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, जिल्हा शल्य चिकित्सक सतीशकुमार सोळंके, नगर परिषदेचे मुख्याधिकारी शैलेस फडसे हे उपस्थित राहणार आहेत.

सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे मार्गदर्शक आमदार संदिप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

---

## पुरूषोत्तमपुरी येथील रेखा मोरे यांचे निधन

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील पुरूषोत्तमपुरी येथील रहिवासी असलेल्या सौ. रेखा हिरामण मोरे यांचे आज बुधवार दि. १८ रोजी सकाळी सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. निधना समय त्यांचे वय ६५ वर्षं इतके होते. ज्ञत्यांच्या निधनाची वार्ता समजताच पुरुषोत्तमपुरी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

माजलगाव तालुक्यातील पुरूषोत्तमपुरी येथील रहिवासी असलेल्या सौ. रेखा हिरामण मोरे ह्या अत्यंत शांत संयमी आणि मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या. त्यांना पुरुषोत्तमपुरी गावात आक्का या नावाने ओळखले जात होते. त्यामागील काही दिवसापासून आजारी होत्या. त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (घाटी) उपचार सुरू होते. अखेर आज बुधवार दि. १८ रोजी सकाळी सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास त्यांचे निधन झाले. दुपारी २ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या पार्थिवावर पुरूषोत्तमपुरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पुरूषोत्तमपुरीसह पंचक्रोशीतील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील नेतेमंडळी, कार्यकर्ते, नागरिक, शिक्षक, डॉक्टर, वकील, इंजिनिअर, पत्रकार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे, दोन मुली, जावई, नातवंडे तसेच तीन भाऊ असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून सर्वत्र शोककळा पसरली आहे.

---

## धांडे नगर भागातील धोकादायक डीपी हलवा

### शिवसेनेची वीज वितरण कंपनीकडे मागणी





**बीड । प्रतिनिधी**

मारूती शोरूमच्या मागील धांडे नगर येथील डीपी इतर ठिकाणी स्थलांतरीत करण्यात यावी अशी मागणी या भागातील नागरीकांकडून केली जात आहे तसे निवेदन वीज वितरण कंपनीला दिले आहे. धांडे नगर येथील ४४१२३०५ या डीपीचे स्थलांतर करण्याची मागणी केली जात आहे. सदरील या डीपीमुळे धोंका निर्माण होण्याची श३यता आहे. दोन दिवसापुर्वीच डीपीच्या वायरला चिटकून एकाचा मृत्यू झालेला आहे. त्यानंतर तरी वीज वितरण कंपनीने यातून बोध घ्यावा आणि जे धोकादायक डीपी आहेत ते हलविण्याची मागणी केली जात आहे. धांडे नगरयेथील डीपीचे अंतर गल्लीपासून अत्यंत कमी आहेत. त्या ठिकाणी लहान मुले वारंवार खेळत असतात. भविष्यात यातून कोणतीही दुर्घटना होवू नये यासाठी डीपी हलविण्याची मागणी शिवसेनाव तालुका प्रमुख हरिभाऊ शेळके यांनी वीज वितरण कंपनीकडे केली आहे.

---



शिवजयंती

निमित्त सर्व शिवभक्तांना
हार्दिक शुभेच्छा..!

बीड जिल्हा सहकारी मजुर संस्थाचा
सहकारी संघ मर्यादीत,बीड

रजि.नं.बीएचआर/पीआरडी/एल-१३८ दिनांक : २१-१२७० फोन: २२३३३९ Email : beedmajursm@gmail.com

लक्ष्मण नगर,भगवानबाबा प्रतिष्ठाणच्या पश्चिमेस,बार्शी रोड,बीड ता.जि.बीड

संघाची वैशिष्ट्ये : १) संघाची स्वतःचे मालकीची दोन मजली ईमारत २) मजूर सह. संस्थेची अडी अडचणी सोडवण्यात अग्रेसर ३) सभासद मजूर संस्थांना कामे मिळवुन देण्यात अग्रेसर

संचालक मंडळ : १) श्री. जटाळ बद्रीनाथ दुधाराम २) माने दिलीप विठ्ठलराव ३) सोनवणे भगवान काकासाहेब ४) शेख शब्बीर मन्सब ५) सोनवणे माधव सर्जेराव ६) तिडके परमेश्वर दत्तात्रय ७) नागरगोजे भास्कर धोंडीराम ८) क्षिरसागर आनंद सुभाष ९) राठोड अंकुश दगडु १०) गोरे वसंत भुजंगराव ११) सौ.देसाई सुनिता काकासाहेब १२) सौ. कटाळे राधाबाई नामदेव १३) सौ. हायळे शकुंतला बाळासाहेब १४) सौ.देशमुख संध्या मंगेश



श्री.अमृत श्रीरंग रसाळ
व्हा.चेअरमन



श्री.बी.ई.सिरसाट
चेअरमन

तज्ञ संचालक : १) सुनिल बापुराव सिरसाट २) चौधरी मुजफ्फर सुलतान सर्व कर्मचारी वृंद